न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय मुंबई

गृह विभाग महाराष्ट्र राज्य

# Do’s & Don’t’s

**विभागात दाखल होणारे विविध मुद्देमाल पाठवण्यासंबंधी तपासी अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना :**

| विभागाचे नाव | करावे (Do's) | करु नये (Dont's) |
|---|---|---|
| विषशास्त्र | रासायनिक विषपरीक्षणाकरिता व्हिसेरा व रक्त ( Viscera-I, Viscera-II, Blood) cm-23 me-form वैदयकीय अधिकाऱ्यांकडून पूर्ण भरुन पाठवावा | cm-23 me-form डॉक्टरांकडून भरलेला नसल्यास ( As per p.m.notes अशी नोंद असल्यास) p.m.रिपोर्टच्या छायांकित प्रतीशिवाय मुद्देमाल स्विकारला जाणार नाही. |
| | रक्त / जठर धुवण (वांती) / लघवी,चामडी / हाडे यांच्या विषपरीक्षणाकरिता '' cm-24 me''form वैदयकीय अधिकाऱ्यांकडून भरुन पाठवावा. | सदर मुद्देमालासाठी वेगळा फॉर्म वापरु नये. |
| | cm 23 me व cm 24 me फॉर्मवर मृतकाचे / जखमी व्यक्तीचे नाव / PM No/ EPR No./दिनांक,सीलची प्रतिकृती,वैदयकीय अधिकाऱ्यांची सही व शिक्का,तसेच कोणते परीक्षण अपेक्षित आहे याची नोंद आवश्यक आहे. | सदर फॉर्म सीलबंद पाकिटातून आणू नये. सदर बाबींची नोंद form वर असल्याची खात्री संबंधित दवाखान्यात करुन घ्यावी. |
| | घटनास्थळावरुन जप्त केलेला मुद्देमाल (वांती / माती / रक्त / तोंडातील फेस / कपडे / भांडी इ.) स्वतंत्रपणे वेष्टनात बांधून त्यावर पोलीस ठाण्याचे लाखेचे सील व लेबल (मयताचे नाव,पोलीस ठाणे,जिल्हा,अ.मृ.रजि.नं. / गु.र.क्र. / स्टे.डा.नो.क्र. / पंचाची नाव व सही दिनांकासह,कलम व मुद्देमालाचे वर्णन इ.) चिकटवून परीक्षणाकरिता प्रयोगशाळेत लवकरात लवकर पाठवावा | 1) मुद्देमालांवर (किटकनाशकांचे डब्बे,औषधे) लेबल चिकटवू नये. त्यांना वेष्टनात बांधून त्यावर लेबल लावावे.<br>2) गोळा केलेला मुद्देमाल कंट्रोल सॅम्पलसोबत एकत्र होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>3) सर्व मुद्देमाल एकत्र बांधून पाठवू नये.<br>4) सदर मुद्देमाल व्हिसेरा सोबतच किंवा कमीत कमी मुदतीच्या फरकाने पाठवावा. |
| | cm 23 me व cm 24 me form सोबत पोलीस ठाण्याच्या प्राधिकार पत्रावर जावक क्र.,दिनांक, अ.मृ. रजि.नं. / गु.र.क्र. / स्टे.डा.नोंद क्रमांक दिनांकासह,मयताचे पूर्ण नाव,गुन्हयाचे सविस्तर वर्णन,अग्रेषित करणाऱ्या अधिकाऱ्यांची सही व शिक्का आवश्यक आहे. | 1) सदर पोलीस प्राधिकार पत्राची छायांकित प्रत / कार्बन प्रत स्वीकारली जाणार नाही.<br>2) पोलीस प्राधिकार पत्रातील मयताच्या नावात व वैदयकीय अधिकाऱ्यांच्या पत्रातील मयताच्या नावात तफावत असल्यास मुद्देमाल स्विकारला जाणार नाही. |
| | पोलीस ठाण्यांकडून विषपरीक्षणाकरिता अग्रेषित केलेल्या मुद्देमालावर लावलेल्या पितळी सीलची प्रतिकृती पोलीस प्राधिकार पत्रावर (शाईची प्रतिकृती) आवश्यक आहे. तसेच सीलवरची अक्षरे वाचता येण्याजोगी असावी. | 1) पोलीस प्राधिकार पत्रावर लाखेचे सील प्रतिकृती म्हणून लावू नये.<br>2) तसेच सीलकरिता बटन,नाणी इ. वापर करु नये. |
| | विषपरीक्षणानंतर अजैविक मुद्देमाल (घटनास्थळावरील जप्त वस्तू) अहवाल प्राप्त झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पोलीस प्राधिकार पत्रासोबत परत नेण्याची व्यवस्था करावी. | डॉक्टरांनी पाठविलेला जैविक मुद्देमाल (व्हिसेरा,रक्त इ.) परीक्षणानंतर परत केला जात नाही याची नोंद घ्यावी. अजैविक मुद्देमाल विलंबाने घेऊन जाण्याची कार्यवाही करु नये. |
| | खाजगी इस्पितळाकडून आलेल्या जैविक व अजैविक मुद्देमालाच्या विषपरीक्षणाकरिता सदर मुद्देमाल पोलीस ठाण्यांमार्फत पुन्हा सीलबंद करुन प्रयोगशाळेत पाठवावा. | खाजगी इस्पितळाकडून आलेली प्रकरणे सरळसरळ स्विकारली जाणार नाही. (Without seals/ detail information/ ADR etc.) |
| | सर्पदंश प्रकरणांमध्ये रक्त व सर्पदंश झालेल्या | सदर प्रकरणांत वैदयकीय अधिकाऱ्यांना |

| | | |
|---|---|---|
| **विषशास्त्र** | ठिकाणाच्या कातडीचा तुकडा, कंट्रोल कातडीसोबत cm 24 me form भरुन सर्प विषपरीक्षणाकरिता प्रयोगशाळेत पाठवावा. | रासायनिक विषपरीक्षण आवश्यक नसल्यास व्हिसेरा पाठवू नये. सर्पदंश कातडी व कंट्रोल कातडी एकत्रितपणे पाठवू नये. |
| | कुत्रा, उंदीर हे प्राणी चावल्याची हकीकत असलेल्या प्रकरणातील मुद्‌देमाल ''हाफकिन्स इंस्टिटयूट, परेल,मुंबई– 12'' यांना अग्रेषित करावा. | कुत्रा, उंदीर हे प्राणी चावल्याची हकीकत असलेल्या प्रकरणातील मुद्‌देमाल या प्रयोगशाळेत पाठवू नये. |
| | अर्धवट जळालेली हाडे,पुरलेली हाडे यामध्ये विषपरीक्षणाकरिता (Metalic Poisons) फक्त 10 सें. मी. लांबीचा तुकडा वैदयकीय अधिकाऱ्यांमार्फत cm 24 me form सोबत पाठवावा. | 1) हाडाचा संपूर्ण सांगाडा विषपरीक्षणाकरिता पाठवू नये.<br>2) लिंग,वय, याचे परीक्षण सदर प्रयोगशाळेत केले जात नाही. सदर परीक्षण वैदयकीय महाविदयालयातील Dept. of Anatomy येथे केले जाते. |
| | गोळीबाराची हकीकत असलेल्या प्रकरणात जखमेच्या बाजूचा कातडीचा तुकडा, कंट्रोल कातडीच्या तुकडयासोबत cm 24 me form बरोबर वेगवेगळा पाठवावा. | सदर प्रकरणात विषपरीक्षण आवश्यक नसल्यास व्हिसेरा प्रयोगशाळेत पाठवू नये. |
| | सौम्य अन्न विषबाधा प्रकरणात (मयत झाला नसल्यास) सदर मुद्‌देमाल (वांती/अन्न/रस इ.) सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे किंवा बृहन्मुंबई महानगरपालिका विश्लेषक ,प्लाझा सिनेमा जवळ,दादर, मुंबई येथे सूक्ष्मजीवाणू परीक्षणाकरिता पाठवावा. | 1) सदर प्रकरणात मयत झाला असल्यास (वांती/अन्नपदार्थ इ.) मुद्‌देमाल हवाबंद किंवा Ice-box मध्ये बंद केलेला नसल्यास या प्रयोगशाळेत स्विकारला जाणार नाही.<br>2) अन्नपदार्थ व वांतीशिवाय फक्त व्हिसेरा परीक्षणाकरिता स्विकारला जाणार नाही. |
| | पाण्याच्या नमुन्यामध्ये विषपरीक्षण अपेक्षित असल्यास सदर पाण्याचा नमुना पोलीस प्राधिकार पत्रासोबत सीलबंद स्थितीत दाखल करावा. | पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही याचे परीक्षण सदर प्रयोगशाळेत केले जात नाही. (सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठवावा.) |
| | औषधांच्या नमुन्यात लेबलप्रमाणे दर्शविलेल्या घटकांशिवाय दुसरे विषजन्य पदार्थ आहे का? हे पाहण्याकरिता सदर मुद्‌देमाल पोलीस प्राधिकार पत्रासोबत पाठवावा | सदर प्रकरणात औषधाचे संख्यात्मक (Q.A.) व Syringe किंवा निर्जंतुक (Sterile) असल्याचे परीक्षण या प्रयोगशाळेत केले जात नाही. (अन्न व औषध प्रशासन,बांद्रा(पूर्व),मुंबई–51 येथे पाठवावेत) |
| | वनस्पतीजन्य विषबाधा प्रकरणात संबंधित वनस्पती कंट्रोल सॅम्पल म्हणून पाठवावी. | कंट्रोल वनस्पतीचा कोणताही अहवाल या प्रयोगशाळेतून दिला जाणार नाही. |
| | "Finger tips skin" Finger Print तपासणीसाठी या प्रयोगशाळेऐवजी Finger print bureau येथे पाठवावी. | "Finger tips skin" Finger Print तपासणीसाठी या प्रयोगशाळेत पाठवू नये. |
| | विषबाधेची सर्व प्रकरणे तीन महिन्यांच्या आत या प्रयोगशाळेत परीक्षणाकरिता दाखल करावी. | तीन महिन्यांपेक्षा जास्त उशीर झाल्यास सदर बाबींच्या खुलाशाचे पोलीस प्राधिकार पत्र वरिष्ठांच्या मार्फत अग्रेषित केले नसल्यास प्रकरण स्विकारले जाणार नाही. |
| | पोलीसांनी शक्य असल्यास प्रयोगशाळेत व्हिसेरा ''स्टॅण्डर्ड बॉक्स'' मधून काळजीपूर्वक दाखल करावा. | सदर बाटल्या गळक्या/भिजलेल्या लेबलच्या/सील तुटलेल्या स्थितीत असल्यास स्विकारल्या जाणार नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | स्मरणपत्र दाखल करतांना त्यात मयताचे पूर्ण नाव, अ. मृ.रजि.नं./गु.र.क्र./स्टे.डा.नोंद क्रमांक दिनांकासह PM.No., मुद्देमालाचे वर्णन व मुद्देमाल दाखल केल्याची अचूक दिनांक आवश्यक आहे. | – |
| | विषबाधा प्रकरणात प्रयोगशाळेत दाखल केलेल्या प्रकरणाचे अहवाल अप्राप्त असल्यास वैदयकीय (PM अधिकाऱ्यांकडून झालेल्या इस्पितळा) सदर अहवालाची प्रत प्राप्त होवू शकते. | – |
| **विभागाचे नाव** | **करावे (Do's)** | **करु नये (Dont's)** |
| **जीवशास्त्र/ रक्तजलशास्त्र** | रक्त/इतर जैविक पदार्थ असलेले कपडे पूर्णतः सावलीत वाळवून पाठवावेत | 1) कपडे ओलसर पाठवू नयेत<br>2) कपडे उन्हात/इस्त्रीने वाळवून पाठवू नये. |
| | रक्तमिश्रीत माती/केस/दगड/गवत सावलीत वाळवून पाकीटात घालून कंट्रोल सोबत पाठवावे. | ओलसर अवस्थेत पाठवू नये |
| | फरशी/भिंत/लाकडी सामान/टाईल्स/मोठे दगड/घर सामान इ. अवजड मुद्देमालावरील जैविक डाग स्वच्छ,निर्जंतूक कापडाने पुसून अथवा ब्लेडने खरबडून पाठवावेत.सोबत कंट्रोल पाठवावा | अवजड मुद्देमाल जैविक परीक्षणासाठी पूर्णतः पाठविण्यात येवू नये त्याऐवजी त्यावरील डाग स्वच्छ कापडावर घेऊन तो पाठविण्यात यावा. |
| | गुन्हयाच्या ठिकाणावरील रक्ताचे थारोळे स्वच्छ,निर्जंतूक कापडाचा तुकडा थारोळयात बुडवून, सावलीत वाळवून पाठवावा | घटनास्थळावरील ओले रक्त बाटलीत अथवा प्लॅस्टिक कंटेनरमध्ये भरुन पाठवू नये. |
| | मांसल भाग ताजा असल्यास स्वच्छ काचेच्या बाटलीत घालवून पाठवावा/नॉर्मल सलाईन मध्ये घालून पाठवावा. | कुजलेल्या व खराब झालेल्या मांसाचा तुकडा विश्लेषणास योग्य नसल्यास पाठवू नये. |
| | मुद्देमाल पॅकिंग–प्रत्येक मुद्देमाल वेगवेगळा बांधून पाठवावा | ओलसर किंवा एकत्र बांधून पाठवू नये. |
| | घटनास्थळावरील मुद्देमाल तज्ज्ञांच्या मार्गदर्शानुसारच पाठवावा. | मुद्देमाल गोळा करतांना अडचण येत असेल तर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाविना पाठविणे टाळावे. |
| | घटनास्थळावरील माती व आरोपी/फिर्यादी यांच्या कपडयावरील माती यांचे तुलनात्मक परीक्षण गुन्हे तपासाच्या दृष्टीने महत्वाचे असल्यासच पाठवावी. | घटनास्थळ एकच असल्यास माती तुलनात्मक परीक्षणासाठी पाठवू नये. |
| | जप्त मुद्देमालाच्या पार्सलवर तपासी अधिकारी यांनी गु. र.क्रमांक, पंचांच्या सहयांचे लेबल पोलिस स्टेशनचे सील ई. माहिती स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. | सदरची माहिती पार्सल/मुद्देमालावर नसल्यास तो अयोग्य समजण्यात येईल व प्रकरण स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| | घटना घडल्यानंतर तज्ज्ञांना पाचारण करणेसाठी गुन्हयाची थोडक्यात माहिती असणारे पत्र पोलिस कर्मचाऱ्यांच्या हाती देवून शक्य तितक्या लवकर कार्यालयाशी संपर्क करावा.<br>अग्रेषण पत्रामध्ये तपासी अधिकारी किंवा संबंधित पोलिस ठाण्याचा संपर्क क्रमांक नमूद करण्यात यावा. | घटना घडल्यानंतर तज्ज्ञांना पाचारण करण्यासाठी उशीर झाल्यास जैविक पदार्थ/द्रव विघटन होवून परीक्षणासाठी निरुपयोगी होण्याची शक्यता असते. तरी, विलंबाने संपर्क करणे टाळावे. |

| | | |
|---|---|---|
| **डी.एन.ए.** | बलात्काराच्या प्रकरणातील वैदयकीय अधिकाऱ्यांकडून बळीत मुलीच्या अंगावरील मुद्देमाल घटना घडल्यापासून पंधरा दिवसांच्या आत जप्त केला असल्यास डी.एन.ए. चाचणीसाठी दाखल करावा. | बलात्काराच्या प्रकरणातील बळीत मुलीचा मुद्देमाल घटना घडल्यापासून पंधरा दिवसांनंतर घेतला असल्यास डी.एन.ए. चाचणीसाठी पाठवू नये. |
| | डी.एन.ए. चाचणीसाठी जप्त केलेला मुद्देमाल विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत तत्काळ दाखल करावा. | डी.एन.ए. चाचणीसाठी जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये दुर्लक्षित ठेवू नका. |
| | प्रमाणित डी.एन.ए. चाचणीसाठी रक्ताचा नमुना प्रयोगशाळेच्या रक्त नमुना गोळा करण्याच्या कीटमधूनच दाखल करण्यात यावा. | प्रमाणित डी.एन.ए. चाचणीसाठी रक्त उपलब्ध असल्यास वीर्य,लाळ किंवा इतर स्त्राव पाठवण्याची आवश्यकता नाही. |
| | डोक्यावरील विंचरलेले केस डी.एन.ए. चाचणीसाठी पाठवावेत. | डोक्यावरील केस कात्रीने कापून पाठवू नयेत. |
| | बलात्काराच्या प्रकरणातील आरोपीच्या अंगावरील मुद्देमाल घटना घडल्यापासून दोन दिवसांच्या आत वैदयकीय अधिकाऱ्याने जप्त केला असल्यास डी.एन.ए. चाचणीसाठी दाखल करावा. | आरोपीच्या अंगावरील मुद्देमाल दोन दिवसानंतर जप्त करु नये. |
| | प्रमाणित रक्ताचा नमुना तात्काळ प्रयोगशाळेत दाखल करावा.सदर नमुना $4^0$C तापमानात जतन करा. | प्रमाणित रक्ताचा नमुना जास्त वेळ बाहेर ठेवू नका व तात्काळ प्रयोगशाळेत पाठविण्याची व्यवस्था करा. |
| | प्रमाणित रक्ताचा नमुना घेण्यासाठी न्या.वै.प्र.शा. कालिना मुंबई यांच्याकडील Blood Collection Kit चा वापर करा. | प्रमाणित रक्ताचा नमुना घेण्यासाठी इतर रसायनांचा व साधनांचा वापर करु नका. |
| | मांसल भागाचा मुद्देमाल जतन करण्यासाठी रसायनांचा वापर करु नये. सदर मुद्देमाल $4^0$C तापमानात जतन करा. | मांसल भागाचा मुद्देमाल जतन करण्यासाठी Formalain किंवा इतर रसायनांचा वापर करु नका केल्यास मुद्देमाल डी.एन.ए. चाचणीसाठी स्विकारला जाणार नाही. |
| | स्वच्छ केलेल्या हाडाचा नमुना दाखल करा (Maceration पध्दतीने स्वच्छ केलेला ) | अस्वच्छ,कुजलेले हाडाचा नमुना पाठवू नका |
| | अर्भकाच्या मांडीच्या हाडाचा मांसासहित (50 ग्रॅम) नमुना निर्जंतुक प्लॅस्टिकच्या बरणीमध्ये घ्या व $4^0$C तापमानात जतन करा आणि याच तापमानामध्ये प्रयोगशाळेत दाखल करा. | पूर्ण अर्भक पाठवू नका. |
| | HIV,TB व इतर रोगांनी जर्जर झालेल्या भिकाऱ्यांची नखे व डोक्यावरील केस एवढाच मुद्देमाल पाठवा. | मांसल भाग, हाडे, रक्त व इतर नमुने पाठवू नये. |
| | गाय, म्हैस, बैल यांच्या मांसाच्या डी.एन.ए. चाचणीसाठी सदर मांसाचा नमुना 50 ग्रॅम पर्यंतचा तुकडा छोटया निर्जंतुक प्लॅस्टिक बरणीमध्ये घ्या व सीलबंद करुन $4^0$C तापमानाला जतन करुर प्रयोगशाळेत दाखल करा | गाय, म्हैस, बैल यांच्या मांसाचा मोठा तुकडा $4^0$C तापमानाला जतन न केलेला नमुना डी. एन.ए. चाचणीसाठी दाखल करु नका. |
| | न्या.वै.प्र.शा.मुंबई येथील डी.एन.ए. विभागाने नमुने जतन करण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करा. | इतर जतन पध्दतींचा अवलंब करु नका. |

| विभागाचे नाव | करावे (Do's) | करु नये (Dont's) |
|---|---|---|
| **सामान्य विश्लेषण व उपकरणे** | अंमली पदार्थाचा जप्त केलेला मुद्‌देमाल 72 तासांच्या आत सीलबंद करुन तपासणीसाठी पाठवावा. | तीन महिन्यानंतर मुद्‌देमाल दाखल करुन घेतला जात नाही. |
| | गांजा/चरस – 24 ग्रॅम व इतर ड्रग्स 5 ग्रॅम/ मि.ली. वजनाचा मुद्‌देमाल तपासणीसाठी पुरेसा असतो. | जास्त मुद्‌देमाल तपासणीसाठी पाठविण्याचे टाळावे. |
| | मुद्‌देमाल सीलबंद करण्यासाठी जे सील (मोहोर) वापरले असेल त्या सीलचा नमुना पोलीस अग्रेषण पत्रावर उमटवावा. | पोलीस अग्रेषण पत्रावर रबरी स्टॅंप व सीलबंद मुदद्‌मालावर लाखेचे सील असे करु नये. |
| | मुद्‌देमालावर मुद्‌देमालाचे वर्णन, गुन्हा क्रमांक, मुद्‌देमाल क्रमांक,पंचाचे नाव व सही,पोलीस स्टेशनचे नाव असणे आवश्यक आहे. | – |
| | अग्रेषण पत्रामध्ये किती मुद्‌देमाल जप्त केला त्याचे वजन व त्यापैकी किती मुद्‌देमाल पाठविला याचा स्पष्ट उल्लेख असावा. | जप्त मुद्‌देमालाचे वजन लिहिण्यात चूक करु नये. |
| | BDDS कडून Detonators Diffuse करुन घ्यावेत व त्याचे अंश परीक्षणासाठी पाठवावी. | Live Detonators (जिवंत Detonators) प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवू नयेत, ते स्विकारले जात नाहीत. |
| | IED मधील Explosive Charge व Detonators यांचे Wiring वेगळे करुन Charge स्फोटकांच्या तपासणीसाठी पाठवावा. | Electric Wire सोबत Explosive Charge पाठवू नये. |
| | Petroleum Products च्या तुलनात्मक तपासणीसाठी शक्य असेल तेव्हा Control Sample जप्त मुद्‌देमालासह तपासणीसाठी पाठवावा. | तुलनात्मक तपासणीसाठी एकच नमुना पाठवू नये. |
| | आयुर्वेदिक/होमीओपॅथीच्या औषधांची तपासणी या प्रयोगशाळेत केली जात नाही. तथापि संशयित ।ससवचंजीपब क्तनहे/रसायने यांचा अंश आयुर्वेदिक औषधात आहे किंवा नाही याची तपासणी आवश्यक असल्यास तसा उल्लेख करुन मुद्‌देमाल तपासणीसाठी पाठवावा. | – |
| | लस ;टंबबपदमद्ध तपासणीचे नमुने या प्रयोगशाळेत पाठवू नयेत. | लस ;टंबबपदमद्ध तपासणीचे नमुने थ्क। प्रयोगशाळेत पाठवावे. |
| | | **प्लास्टीक बाटल्यामध्ये रसायनयुक्त मुददेमाल पाठवून नये.** |

| विभागाचे नाव | करावे (Do's) | करु नये (Dont's) |
|---|---|---|
| **दारुबंदी व उत्पादन शुल्क** | जप्त केलेली गावठी दारु, गुळाचे रसायन, ताडी ही परीक्षणासाठी पाठवितांना स्वच्छ काचेच्या 375 मिली च्या बाटलीमध्ये मुद्देमाल भरुन पाठविण्यात यावा. | मुद्देमाल पाठवायची बाटली अस्वच्छ असू नये. |
| | त्या बाटलीवर मुद्देमाल जप्त केल्याची तारीख, गुन्हयाचे ठिकाण, आरोपींची नावे, गुन्हो नोंद क्रमांक,कलम. मुद्देमालाचे वर्णन व दोन पंचांच्या तपासी अंमलदारांसमक्ष सहया यांचा उल्लेख करावा | मुद्देमालावर सदर सर्व गोष्टींचा उल्लेख असल्याशिवाय मुद्देमाल स्विकारला जाणार नाही. |
| | वरीलप्रमाणे दोन लेबल बनवून एक बाटलीवर चिकटवणे व दुसरे बाटलीच्या झाकणावर धाग्याने बांधून लाखेने पोलिस ठाण्याने/राज्य उत्पादन शुल्कच्या पितळी सीलने सील करावे. | बाटलीवर लेबल लावतांना ते बाटलीच्या मूळ लेबलवर (Printed Label) लावू नये |
| | त्या सीलचा नमूना अग्रेषण पत्रावरही शाईने उमटवावा | अग्रेषण पत्रावरील नमूना सील व बाटलीवरील सील वेगळे असू नये. |
| | अग्रेषण पत्रावर वरील सर्व बाबींचा उल्लेख करुन अधिकाऱ्यांची सही व त्याच्या हुद्दयाचा शिक्का शाईने उमटवावा | अग्रेषण पत्रावर हुद्दयाचा शिक्का नसल्यास मुद्देमाल स्विकारला जाणार नाही. |
| | जप्त केलेला मुद्देमाल 15 दिवसांत रासायनिक परीक्षणासाठी पाठवावा | मुद्देमाल परीक्षणासाठी दाखल करण्यास उशिर करु नये |
| | Excise प्रकरणाबाबत मुद्देमाल परीक्षणास पाठवताना अनुक्रमांक, बॅच क्रमांक, तारीख, कंपनीचे नाव व मुद्देमालाचे वर्णन दयावे. | सदर नोंदी असल्याशिवाय मुद्देमाल स्विकारला जाणार नाही |
| | अग्रेषण पत्रावर वरील सर्व उल्लेख करुन राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्याची सही व हुद्दयाचा शिक्का व त्याच्या पितळी सीलचा ठसा शाईने उमटवावा | अग्रेषण पत्रावर हुद्दयाचा शिक्का व सीलचा नमुना असल्याशिवाय मुद्देमाल स्विकारला जाणार नाही |
| | सदर मुद्देमाल एक महिन्याच्या आत रासायनिक परीक्षणासाठी पाठवावीत | मुद्देमाल परीक्षणासाठी पाठविण्यास उशिर करु नये |
| | वैदयकीय अधिकारी यांनी ताब्यात दिलेले नमुने दोन दिवसांच्या आत या प्रयोगशाळेत जमा करावे | दोन दिवसानंतर पाठविलेला मुद्देमाल विलंबाच्या खुलाशशिवाय स्विकारला जाणार नाही. |
| | अपघात घडला असता लवकरात लवकर आरोपीचे रक्त काढण्यासाठी त्याला सरकारी दवाखान्यात घेवून जावे. | आरोपीचे रक्त घेण्यास जास्त वेळ लावू नये. |
| | अग्रेषण पत्रात पोलिस स्टेशन, सी.आर. नं., गुन्हा घडल्याची तारीख व वेळ, गुन्हा दाखल तारीख व वेळ व गुन्हयाची थोडक्यात या बाबींचा उल्लेख करावा | सदर बाबींचा उल्लेख अग्रेषण पत्रात असल्याशिवाय मुद्देमाल स्विकारला जाणार नाही |
| | पोलिसांनी मुद्देमाल दाखल करण्यासाठी गणवेशातच यावे | पोलिस गणवेशात नसल्यास मुद्देमाल स्विकारला जाणार नाही |
| | पोलिस अग्रेषण पत्रावर पोलिस ठाण्याचा शिक्का मारणे आवश्यक आहे | अग्रेषण पत्रावर पोलिस ठाण्याचा शिक्का असल्याशिवाय मुद्देमाल स्विकारला जाणार नाही. |

| विभागाचे नाव | करावे (Do's) | करु नये (Dont's) |
|---|---|---|
| **संगणक** | हार्डडिस्क सी.पी.यु. अथवा लॅपटॉप मधून तज्ज्ञांकडून काढून पाठवावी | सी.पी.यु., लॅपटॉप पाठविण्याची आवश्यकता नाही |
| | संगणकामधील अथवा लॅपटॉमधील काढलेली हार्डडिस्क ज्या क्षमतेची आहे त्याच्या दुप्पट क्षमतेची कोरी हार्डडिस्क पाठवावी | **कोरी** हार्डडिस्क ही जुनी, वापरलेली अथवा तुटलेली नसावी |
| | अग्रेषण पत्रावर हार्डडिस्कचा मेक,सिरीयल नंबर,क्षमता इत्यादीचा उल्लेख करावा | — |
| | प्रत्येक मुद्देमाल जसे हार्डडिस्क, सी.डी.,डी.व्ही.डी., पेन ड्राईव्ह स्वतंत्र मोहोरबंद करुन त्याचा पंचनामा करावा. | — |
| | हार्डडिस्क सीलबंद करतांना ॲन्टीस्टॅटिक बॅग वापर करावा | प्लॅस्टिक बॅग वापरु नये अन्यथा चुंबकीय क्षेत्र तयार होऊन माहिती लुप्त होवू शकते |
| | मिरर इमेज हवी असल्यास तेवढया क्षमतेची अतिरिक्त हार्डडिस्क पाठवावी व अग्रेषण पत्रावर तसा स्पष्ट उल्लेख करावा. | — |
| | मोबाईल फोन प्रयोगशाळेत पाठवितांना स्वीच ऑफ केलेला असावा. फोनमधील सीमकार्ड, मेमरी कार्ड, बॅटरी इ. काढूनच फोन सीलबंद करावा (सोबत काढलेले सीमकार्ड, मेमरीकार्ड असल्यास, बॅटरीपण सीलबंद करुन पाठवावी ) | मोबाईल चालू स्थितीत पाठवू नये. फोनमध्ये सीमकार्ड तसेच राहिल्यास फोन हाताळतांना चुकून नेटवर्क कनेक्ट होवू शकतो. |
| | फोन जप्त करतांना अग्रेषण पत्रावर तो कोणाकडून जप्त केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.उदा. आरोपी, फिर्यादी, साक्षीदार इ. आरोपी/फिर्यादी यांचेकडील वापरात असलेले अतिरिक्त फोन असल्यास तेही पाठविण्यात यावे | |
| | मोबाईल वरील आयएमईआय क्रमांक, मॉडेल क्रमांक, सिरीयल नंबर तसेच सिमकार्ड व मेमरी कार्डवरील क्रमांक अचूकरित्या अग्रेषण पत्रावर नमूद करावे. | मोबाईल चार्जर (सॅटेलाईट फोन वगळता), मेमरी कार्डरीडर प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवू नयेत. |
| | मोबाईल फोन जप्त करतेवेळी तुटक्या अवस्थेत असल्यास अग्रेषण पत्रात तसे नमूद करावे | — |
| | मोबाईल फोनला पासवर्ड असल्यास तसेच सिमकार्डला पी.यु. के.कोड असल्यास तो कळवावा. | — |
| | सॅटेलाईट फोन जमा करतेवेळी त्याचे ड्राईव्हर सी.डी. असल्यास तेही जमा करावेत. | — |
| | सी.सी.टी.व्ही.फुटेज संदर्भातील प्रकरणात डी.व्ही.आर.मशीन व त्यातील हार्डडिस्क वेगळेवेगळे सीलबंद करुन पाठवावे | डी.व्ही.आर. मशीन शक्यतो गुन्हयाच्या ठिकाणावरुन जप्त केलेलीच असावी, ती उपलब्ध न झाल्यास त्याच कंपनीची व तेच मॉडेल असलेली मशीन पाठवावी |
| | डी.व्ही.आर.चे ॲडॅप्टर पाठविणे आवश्यक आहे तसेच डी.व्ही. आर मधील काढलेली हार्डडिस्क ज्या क्षमतेची आहे तेवढयाच क्षमतेच्या दोन कोऱ्या हार्डडिस्क पाठवाव्यात. | — |
| | गुन्हया संदर्भातील सी.सी.टी.व्ही.फुटेज हे ओव्हरराईट होण्याच्या मुदतीपूर्वी जप्त करावे | — |
| | डी.व्ही.आर. मशीनला पासवर्ड असल्यास तसेच सॉप्टवेअर सी. डी.असल्यास ते सोबत पाठवावे | |

| | | |
|---|---|---|
| | अहवाल व अहवालासोबत देण्यात आलेला Digital अहवाल (e.g.Annexure HDD,DVD,CD,Pen Drive etc.) हा अहवालाचा भाग असल्याचे लेखी अहवालात स्पष्ट नमूद केलेले आहे तरी ते आपण पोलीस स्टेशनला Open करुन पहावे व कोर्टात सादर करतांना तसेच अथवा प्रिंट काढून सादर करावे. | प्रयोगशाळेतून कोर्टात सादर करणेकामी अतिरिक्त Digital अहवाल (e.g.Annexure HDD,DVD,CD,Pen Drive etc.) मागू नये. |
| | विश्लेषण अहवाल तयार असलेबाबत पत्र प्राप्त झाल्यानंतर तात्काळ प्रयोगशाळेत पोलीस शिपायास पाठवून अहवाल व मुद्देमाल प्राप्त करुन घ्यावा | प्रयोगशाळेत बराच मुद्देमाल पडून असल्यामुळे मुद्देमाल तात्काळ परत न नेल्यास जागा अपुरी पडते. |
| | प्रकरण पाठवितांना मुद्देमालासोबत काही संदर्भासाठी कागदपत्रे (Reference Documents) पाठवायचे असल्यास सदर कागदपत्रातील प्रत्येक पानावर तपासी अधिकाऱ्यांनी साक्षांकित करुनच पाठवावे. | |
| | काही प्रकरणात आरोपी/फिर्यादी/साक्षीदार यांचे फोटोग्राफ्स पाठवायचे असल्यास पोस्टकार्ड साईजचे फोटो तिन्ही दिशेने घेतलेले साक्षांकित करुन पाठवावे | पासपोर्ट साईज फोटो पाठवू नयेत. |
| **तासी** | 1) गुन्हा घटनास्थळी व्हाईस रेकॉर्डर चालू स्थितीत आहे किंवा नाही हे पडताळून पहा.<br>2) ज्या मूळ मेमरी कार्डमध्ये संभाषण झाले आहे ते मेमरी कार्ड तपासणीसाठी पाठवावे.<br>3) गुन्हयाच्या वेळीचा आवाज व नमुना आवाज हा (स्वतंत्र) वेगवेगळया मेमरी कार्डवर घ्यावा.<br>4) प्रत्येक मुद्देमाल स्वतंत्र मोहोरबंद करुन त्याचा पंचनामा करावा | 1) नमुना आवाज घेतांना संभाषण सोडून इतर आवाज येणार नाही (पंखा,ए.सी.,टी.व्ही.) याची खबरदारी घ्यावी.<br>2) ध्वनीमुद्रण केलेले संभाषण आरोपीच्या समोर एकदा ऐकून पहावे जेणेकरुन संभाषणात कमतरता असल्यास ती दुरुस्त करता येईल. |
| | चित्रीकरण झालेला डी.व्ही.आर./अथवा त्यातील हार्डडिस्क परीक्षणासाठी पाठवावी. | डी.व्ही.आर.अथवा हार्डडिस्क मधील चित्रीकरण जर कॉम्पॅक्ट डिस्क अथवा पेन ड्राईव्ह मध्ये घेतले असल्यास तसे नमूद करुन दयावे. |
| | 1) गुन्हयाच्या वेळी जे संभाषण आरोपीने केले असेल तेच संभाषण आरोपीकडून नमुना आवाज घेतांना बोलून घ्यावे.<br>2) संभाषणाच्या मजकूराच्या प्रत्येक पेपरवर पंच व तपासी अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात. | प्रदर्शिता मध्ये झालेल्या प्रत्येक संभाषणाचा मजकूर व त्याचा पंचनामा असणे आवश्यक आहे. |

**Important:**

1. संगणक गुन्हे व ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण गुन्हयासंदर्भात हॅश व्हॅल्यु काढण्याचे योग्य प्रशिक्षण व वैध उपकरणे (Licensed Software Equipment) असेल तरच हॅश व्हॅल्यु काढण्यात यावी अन्यथा हॅश व्हॅल्यु काढु नये तसेच हॅश व्हॅल्यु काढल्यानंतर तो मुददेमाल पुन्हा हाताळू नये.

2. Digital Exhibits सिलबंद करणेसाठी Antistatic Bags व Bubble Warpper चा वापर करणे आवश्यक आहे.

| विभागाचे नाव | करावे (Do’s) | करु नये (Dont’s) |
|---|---|---|
| **मानसशास्त्र** | संशयित, फिर्यादी ,आरोपी,साक्षीदार व बळीत असल्यास त्यांची नार्को टेस्ट करिता कोर्ट परवानगी घेणे बंधनकारक आहे. | – |
| | संशयित, फिर्यादी ,साक्षीदार असल्यास त्यांची पॉलीग्राफ किंवा बी.ई.ओ.एस. (ब्रेन ईलेक्ट्रिकिल ऑस्सिलेशन सिग्नेचर प्रोफाईलिंगऋकरिता कोर्ट परवानगी शिवाय प्रकरण पाठवू शकता. | – |
| | आरोपी, बळीत, साक्षीदार,संशयित, आणि फिर्यादी यांची मानसशास्त्रीय चाचणी करिता त्यांची संमती घेणे . | – |
| | ज्यांची मानसशास्त्रीय चाचणी करायची आहे त्यांची पुरेशी झोप होणे आवश्यक आहे. | – |
| | बी.ई.ओ.एस. (ब्रेन ईलेक्ट्रिकिल ऑस्सिलेशन सिग्नेचर प्रोफाईलिंगऋ चाचणीला येण्यापूर्वी ज्यांची चाचणी घ्यायची आहे त्यांनी डोक्याचे केस स्वच्छ धुवून तेल न लावता येणे | – |
| | या विभागात केस दाखल करतांना अग्रेषण पत्रावर मानसशास्त्रीय चाचण्या ( पॉलीग्राफ, ब्रेन ईलेक्ट्रिकिल ऑस्सिलेशन सिग्नेचर प्रोफाईलिंग (बी.ई.ओ.एस., नार्को–ॲनालिसिसऋ असा उल्लेख असावा. | या विभागात केस दाखल करतांना अग्रेषण पत्रावर केवळ नार्को–ॲनालिसिस असा उल्लेख करु नये. |
| | या विभागात केस दाखल करतांना **दोन**पेक्षा जास्त लोकांची मानसशास्त्रीय चाचणी करावयाची असेल तर त्यासाठी वेगळे संदर्भपत्र पाठवण्यात यावेत. | – |
| | आरोपी व बळीत असल्यास त्यांची कोर्ट परवानगी घेणे बंधनकारक आहे. | – |

| विभागाचे नाव | करावे (Do's) | करुन नये (Don't) |
|---|---|---|
| क्षेपणास्त्र | अग्नीशस्त्र संबंधित प्रकरणे मुंबई प्रयोगशाळेत अग्रेषित करावी. | नागपूर प्रशासकीय विभागातील प्रकरणे मुंबई प्रयोगशाळेत न पाठवता नागपूर प्रयोगशाळेत पाठवावीत. |
| | अग्रेषण पत्रासोबत X – ray,Injury,PM Report शक्य असल्यास जखमेचे छायाचित्र/व्हिडीओ चित्र यांच्या प्रती अग्रेषण पत्रासोबत पाठवाव्यात. | MRI,CT – Scan रिपोर्ट पाठवू नयेत |
| | अग्नीशस्त्रासोबत संबंधित कॅलीबरची चार ते पाच जिवंत काडतुसे गोळीबार चाचणी करीता पाठवातीत | |
| | अग्नीशस्त्र व संबंधीत मुददेमाल सिलबंद करताना लाखेचा वापर करुन प्रमाणीत असलेले सिल उमटवावे व त्याची कॉपी शाईमधुन अग्रेषण पत्रावर उमटवावी. | बटन, रिंग,नाणी पोलीस टोपी वरील भारतीय राजमुद्रा यांचा वापर करुन नये. |
| | काचेच्या तावदानावरील गोळीबाराचे छिद्र (Shothole) कागदी पुठठा,थर्माकोल शीट व सेलाफेन टेप चिकटपटटीचा वापर करुन व्यवस्थित जतन करावे. | |
| | अग्नशस्त्राच्या बॅरेल मध्ये जिवंत काडतुसे अथवा पुंगळी आहे का? हे तपासून पहावे जमल्यास ते काढुन वेगळे पाठवावे तसे न जमल्यास अग्नीशस्त्र सुरक्षित सिल करुन लेबलवर लाल अक्षरात “लोडेउ काडतुस असलेले अग्नीशस्त्र” असा स्पष्ट उल्लेख करावा. | कोणत्याही परिस्थित लोडेड काडतुस असलेली अग्नीशस्त्र असुरक्षित पाठवू नयेत. |
| | शक्य असल्यास सदर काडतुस /पुंगळी उजव्या किंवा डाव्या बॅरेल मधुन प्राप्त झाली (डबल बॅरेल अग्नीशस्त्राच्या बाबतीत) याचा ही उल्लेख करावा. | |
| | घटना स्थळाचा शोध व्यवस्थीत घेऊन जास्ती जास्त काडतुसे/पुंगळया/बुलेट सुटुन निघालेली प्रायमर कॅप प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा व ती प्रथम कापसात पॅक करुन नंतर सिलबंद कराव्यात | |
| | गोळीबाराचे छिद्र असलेली चामडी (Skin pises with shothole) ही द्रव पदार्थात (Formaline/saline) न पाठवता कागदी पुठठयावर व्यवस्थित टाचुन कंटेनरमध्ये सिलबंद करुन पाठवावे. | सदर चामडी (Skin pises with shothole) ही द्रव पदार्थ जसे Saline Formaline मध्ये पाठवू नये |

| | | |
|---|---|---|
| | आत्महत्ये संबंधीत प्रकरणात मृतकाच्या हातातील शस्त्राची डावी अथवा उजवी बाजुची पकड व स्थिती याचा स्पष्ट उल्लेख अग्रेषण पत्रात करावा. | |
| | रक्ताने भिजलेले जखमी/मृतकाचे कपडे सावलीत वाळवून (शॉट होल) गोळीबाराचे छिद्र लाल रंगाने अधोरीखीत करुन प्रत्येक कपडे वेगवेगळे सिल करुन पाठवावे. | कपडे उन्हात वाळून नयेत,ओले कपडे एकत्र बांधु नयेत. |
| | मृतकास ताबडतोब सरकारी रुग्णालयात शवविच्छेदना करीता पाठवावे व प्रथम डॉक्टरांस मृतकाच्या शरीराचे X – ray काढावयास सांगावेत. | |
| | गोळीबार केलेल्या व्यक्तीच्या हातावरील गोळीबाराचे अंश काढण्याकरीता 5% नायट्रीक ॲसिडचा वापर करावा ते शक्य नसल्यास उर्ध्वपातीत जल (Distilled water) अथवा साधे पाणी स्वच्छ कापडावर अंगठा व तर्जनी (Web Purtion) या मधील भाग रगडून पुसुन घ्यावा ही कृती दोन्ही हाताकरीता करावी हे दोन्ही (Swab) स्वॅब वेगवेगळे सिलपॅक करावे तसेच एक साधा त्याच पाण्यात ओला केलेला स्वॅब कंट्रोल म्हणुन पाठवावा. | हॅन्ड वॉश घेताना हात धुतलेले पाणी पाठवून नये. |
| | घटना स्थळावर आढळुन आलेली अग्नीशास्त्राचे सुटे भाग जसे अग्नी शस्त्राची नळी,बट,ट्रीगर इ. सर्व गोळा करुन विश्लेषणाकरीता पाठवून दयावेत | अग्नीशस्त्राच्या कोणत्याही सुटा भाग पोलीस स्टेशन मध्ये ठेवुन घेऊ नये. रबर न लावलेले धातुचे फोरसेप बुलेट काढण्यासाठी वापरु नयेत. |
| | मृत अथवा जखमीच्या अंगावरील गोळीबाराचे छिद्र असलेले कपडे फाडून काढताना सदर गोळीबाराचे छिद्र कापले जाणार नाही याची दक्षता घ्यावी. | सदर छिद्रे कापली जाणार नाहीत याची कल्पना शवविच्छेदन करणा-या डॉक्टर व मृत/जखमी चे कपडे काढणा-या पोलीस कर्मचा-यांनी घ्यावी. |

**पोलीस अधिका-यांना विशेष सुचना –**

1. व्हिसेरा व मुददेमाल घटना घडल्यानंतर शक्यतो लवकरात लवकर प्रयोगशाळेत दाखल करावा.

2. विषशास्त्र विभागात व्हिसेरा व मुददेमाल दाखल करताना पोलीस प्राधिकार पत्रामध्ये गुन्हयाची हकीकत ही मुददेसुद व थोडक्यात असावी.

3. अहवाल मिळणे करीता स्मरणपत्र हे व्हिसेरा/मुददेमाल प्रयोगशाळेत दाखल झाल्यानंतर साधारणत: एक महीन्यानंतर देण्यात यावे.

4. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये मुददेमालाचे विश्लेषण केल्यानंतर विश्लेषण अहवाल पोलीस कर्मचा-याच्या हाती दिल्यानंतर सुध्दा पोलीस स्टेशन मार्फत सदर अहवालाच्या दुय्यम प्रतीची मागणी केली जाते. तरी सदर अहवालांची दुय्यम प्रत Without Proper Authorization Letter from Senior Police Officials प्रयोगशाळेकडून देण्यात येणार नाही.

5. पोलीस प्राधिकार पत्रावर ब-याच वेळेस पोलीस स्टेशनचा सदयस्थितील पत्ता नसल्यामुळे पोस्टाने पाठवलेले बरेच अहवाल हे प्रयोगशाळेत परत येत असतात.
Mention: Complete Postal Address with Pincode, Contact Number & Email ID.